# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 12/11/2021 (शुक्रवार)

---

### विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. रामटेक :– दिनांक 11/12/2019 चे 02.36 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे अप. क्र. 827/2019 कलम 452, 354 (अ) भादवी सहकलम 8, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 07/12/2019 चे 13.30 वा. दरम्यान 13 वर्षीय पीडित ही फिर्यादीची मुलगी आहे. पीडित हि घरी एकटी टिव्ही पाहत असतांना आरोपी नामे – रोहित वासुदेव मोहनकर, वय 18 वर्ष, रा. काचुरवाही ता. रामटेक जि. नागपूर याने फिर्यादीच्या घरात प्रवेश करून पीडितेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक 11/12/2019 चे 23.07 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन महिला पोलीस उपनिरीक्षक श्री. निशा भुते, पो.स्टे. रामटेक यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 12/11/2021 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. ओ. पी. जैस्वाल, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 235(2)जाफौ, 452 भादवी मध्ये 1 वर्ष शिक्षा व 500/–रु. दंड व दंड न भरल्यास 7 दिवस सश्रम कारावास, तसेच 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यामध्ये 3 वर्ष सश्रम कारावास व 1000/–रु. दंड व दंड न भरल्यास 15 दिवस सश्रम कारावास, सहकलम 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यामध्ये 3 महिने सश्रम कारावास व 500/–रु. दंड व दंड न भरल्यास 7 दिवस सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. सोनाली राऊत यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. किशोरकुमार वैरागडे तर कर्मचारी पोहवा श्री. मनोज तिवारी व पोशि ईश्वर हुड यांनी मदत केली आहे.

### चोरी

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 9 कि.मी. अंतरावरील थुगाव निपानी नरखेड येथे फिर्यादी नामे– तोताराम गोकुलदास वैष्णव, वय 58 वर्ष, रा. थुगाव निपानी हे शेतात पाणी ओलीत करण्याकरीता गेले असता 12 पाईप स्पिकलरचे दिसुन आले नाही. त्यामुळे फिर्यादी यांनी शेत शिवारात पाहणी केली तेव्हा आरोपी नामे– धनराज भाउराव चौधरी, वय 58 वर्ष, रा. थुगाव निपानी यांचे नाल्या जवळील शेतात पाईप दिसुन आले. फिर्यादी याने ओळखले असुन धनराज यांचे सोबत पाईप माझे आहे असे बोलले असता आरोपीने 'तुझ्या कडुन जे होते ते करून घे' असे म्हणुन धमकावु लागला. फिर्यादीच्या 12 नग स्पिकलर पाईप एकुण किमती 9,600/–रू. चा मुद्देमाल फिर्यादीच्या शेतातुन धनराज याने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक दिनेश वरठे मो. क्र. 7038445782 हे करीत आहे.

## जबर दुखापत

1) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 07 कि. मी. अंतरावरील मौजा मासोद येथे दिनांक 11/10/2021 चे 09.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राहुल केशवराव बोरकर, वय 21 वर्ष, रा. मासोद ता. काटोल, जि. नागपूर व आरोपी नामे– केशवराव बापुराव बोरकर, रा. मासोद काटोल जि. नागपुर हे नात्याने वडील व मुलगा असून आरोपी वडील हे बाहेरुन दारु पिऊन घरी आले व फिर्यादीच्या आईला व आरोपी स्वतःच्या पत्नीला शिवीगाळ करीत असता फिर्यादी मध्यस्थी करण्याकरिता गेले असता आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली व लाकडी काठीने फिर्यादीच्या दोन्ही हाताच्या करंगळी वर मारले त्यामुळे फिर्यादीच्या उजव्या हाताच्या करंगळी ला मार लागला असून रक्त निघत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 325, 504 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक दारासिंग राठोड मो.क्र. 9860426902 हे करीत आहे.

2) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावरील काळा गोटा सावरगाव नरखेड येथे दिनांक 10/11/2021 चे 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– योगेश दौलतराव ठोंबरे वय 45 वर्ष रा. काळा गोटा सावरगाव नरखेड हा शेतातुन बैल घेवुन जात असता आरोपी नामे– 1) दिलीप मालोकर हा त्याच्या घरासमोर उभा होता. तेव्हा फिर्यादी ने म्हटले की, 'तु साऱ्यांचे पैसे देतो माझे का देत नाही' तेव्हा विधीसंघर्षग्रस्त बालक दोन्ही रा. काळागोटा नरखेड याने फिर्यादीला काही न बोलता हातबुक्कीने मारहाण करू लागला, त्यामुळे फिर्यादी हा जमिनीवर पडला त्यानंतर आरोपी क्र 1 याने फिर्यादीला त्याच्या हातातील बासाच्या काळीने डावा हाताच्या मनगटावर मारले त्यामुळे फिर्यादीच्या हात दुखत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 325, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा धनराज भुक्ते मो क्र 9823612858 हे करीत आहे.

## पाण्यात बुडुन मृत्यु

पो. स्टे. कुही :– अंतर्गत मौजा उमरा शिवार येथे दिनांक 11/11/21 चे 08.30 वा.ते 11.00 वा. दरम्यान मृतक नामे– विनायक मधुकर नेवारे, वय 45 वर्ष, रा. उमरा ता.उमरेड हा मजुरीचे कामाला जातो असे म्हणुन घरून गेला. त्याने दारूचे नशेत फिर्यादीचे शेतातील विहीरीवर चढुन प्लास्टीक बाल्टीने पाणी काढण्यास गेला असता त्याचा अचानक तोल जावुन तो विहीरीच्या खोल चिखल पाण्यात बुडुन मृत अवस्थेत दिसला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ.ललिता सुरेश भोसले, वय 48 वर्ष, रा. चांपा ता.उमरेड यांच्या रिपोर्टवरुन पो. स्टे. कुही येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा नामदेव पुजारी मो.न. 7775811619 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 8 कि. मी. अंतरावरील मौजा खोबना जंगल शिवार येथे दिनांक 11/11/2021 चे 13.18 वा. सुमारास मृतक नामे– क्रिष्णा सोमाजी राउत वय 36 वर्ष, रा.खोबना, ता. कूही जि. नागपूर हा वेडसर असल्याने वेडसरपणाच्या अवस्थेत घरून निघुन गेला. नातेवाईकांनी त्याचा शोध घेतला असता दि. 11/11/2021 रोजी सकाळी 06.00 वा. दरम्यान तो मौजा खोबना जंगल शिवारात एका धावडयाच्या झाडाच्या फांदीला पांढऱ्या मळकट रंगाच्या नॉयलॉन दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– निषेध सोमाजी राउत वय 31 वर्ष रा. खोबना, ता. कुही जि. नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास मसपोनि सुचिता मंडवाले मो. नं. 9763234548 या करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत बिना संगम येथे दिनांक 11/11/2021 चे 12.00 वा. दरम्यान फिर्यादीची मोठी आई ही मरण पावली असल्याने व तिचे अस्थी विसर्जनाकरिता फिर्यादी व फिर्यादीचे नातेवाईक तसेच निकेश दिपक वेडेकर(मृतक) वय 30 वर्ष रा. बिनाकी मंगळवारी, कुदंनलाल गुप्ता नगर, नागपुर हे बिना संगम येथे गेले असता व ते नदीच्या पाण्यात आंधोळ करित असतांना मृतकाचा पाय स्लिप होवुन तो नदीत असलेल्या सिमेन्टच्या पिल्लरच्या गडयात पडल्यामुळे व गडयात जास्त पाणी असल्याने सदर मृतक हा त्या गडयाच्या पाण्यात बुडुन स्वता मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रोशन बाबुरावजी नंदनवार, वय 38 वर्ष, रा. बिनाकी मंगळवारी, कुदंनलाल गुप्ता नगर, नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक रेवतकर मो.नं. 9545523736 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर